# वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
## महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय,
## (नोंदणी क्र. GBBSD ४८८/२०१९)
## कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

महाराष्ट्र शासन

kandivali.esis.@gmail.com


---

क्र.कांसारु/महा-राकाविसो/म.भांडार/ IT Assets निर्लेखन / ३।१ /२५ दिनांक: 15 APR 2025

प्रति,
मा.अवर सचिव,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय मुंबई – ४०० ०१२.

विषय:- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर वैद्यकीय अधिक्षक माहा-रा.का.वि.सोसा.रुग्णालय, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) येथीलनिर्लेखन व निरुपयोगी IT Assets उपकरणे विक्रीबाबत दरपत्रके मागविण्यासाठी जाहीरात अपलोड करणेबाबत.

मा.महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, वैद्यकीय अधिक्षक महा-रा.का.वि.सोसा.रुग्णालय, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई १०१. येथील महाराष्ट्र शासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जीएकसी-१०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम, दि.२२.०६.२०१६ नुसार निर्लेखन केलेले सिलबंद दरपत्रके मागविण्याकरीता जाहीरात नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या नमुन्यातील सिलबंद दरपत्रके मागविणारी जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर कृपया जाहिरात अपलोड करण्यात यावी ही विनंती.
(सोबत निविदा नमुना अटि,शर्ती व विक्री करण्यात येणाऱ्या वैद्यकीय उपकरणे नावाची यादी जोडल्या आहेत)

डॉ. केतन छेडा
**वैद्यकीय अधीक्षक**
महा.रा.का.वि.सो.रुग्णालय कांदीवली मुबंई.

प्रत,
मा.आयुक्त, महा.रा.का.वि.सो. यांच्या माहीतसाठी सविनय सादर

**अटी व शर्ती:-**

१) राज्य कामगार रुग्णालय कांदिवली, पूर्व मुंबई-४०० १०१ यांचे कडील निरुपयोगी संगणक,प्रिन्टर, माऊश, कि-बोर्ड, युएसबी,सीपीयु इत्यादी संगणक विषयी असलेले जुने सामान निर्लेखन दरपत्रक पध्दतीने सध्या जेथे आहे, जसे आहे त्या स्थितीत विक्री करणे आहे.

२) सदर निर्लेखित IT ASSETS खरेदी करण्यात ईच्छुक निविदाधारकानी शासकीय सुटटीचे दिवस वगळुन दि. २४/०४/२०२५ पर्यत दुपारी ४.०० वाजे पर्यत राज्य कामगार रुग्णालय कांदिवली, पूर्व मुंबई-४०० १०१ येथे स्वत: किंवा प्रतिनिधी मार्फत सादर करावी. विहीत वेळे नंतर सादर केलेला किंवा पोस्टाने पाठविलेल्या दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत. यास्तव खरेदी दरपत्रक वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी स्विकारल्या जाणार नाहीत. निर्लेखीत करण्यात आलेल्या IT ASSETS उपकरणाचे नावे सोबत जोडण्यात येत आहे. (प्रत संलग्न)

३) सदर विक्री दरपत्रक पध्दतीने करण्यात येणार असल्याने दरपत्रक बंद लिफाफयावर निर्लेखित वैद्यकीय उपकरणे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करुन वैद्यकिय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, कांदिवली, पूर्व मुंबई-४०० १०१ यांच्या नावे दरपत्रक सादर करण्यात यावी. दरपत्रक सोबत पॅनकार्ड, आधारकार्ड व GST नंबर सर्टिफिकेटची छायाकिंत्र प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रक ग्राहय धरली जाणार नाही. दरपत्रक उघडण्याची दिनांक व वेळ दरपत्रक धारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

४) केवळ अशा अवतरणांचा विचार केला जाईल. जे बिनशर्त स्वरुपाचे आहेत आणि संलग्न केलेल्या स्वरुपानुसार वेगवेगळया ई-कचरा वस्तूसांठी वस्तूनिहाय किंमत विचारात घेतले जातील.

५) सर्वाधिक उच्चत्तम दर असणारे दरपत्रधारक यशस्वी म्हणून घोषित केले जाईल.

६) मा. वैद्यकीय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,कांदिवली (पूर्व) यांना कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

७) यशस्वी दरपत्रक धारंकास विक्रीची संपूर्ण रक्कम या रुग्णालयाच्या बँक खात्यात जमा करावी लागेल. तद्नंतरच विक्री करण्यात आलेल्या वस्तु नेण्याचे आदेश देण्यात येतील. (दरपत्रक यशस्वी घोषणेनंतर बँक खात्याचा तपशील कळवला जाईल. दरपत्रके उघडल्यापासून ३ दिवसाच्या आत)

८) विक्रेत्याकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मान्यता प्राप्त ई-कचरा पूनर्वापर करणारे/विघटन करणारे प्रमाणपत्र एप्रिल, २०२५ तसेच सदर प्रमाणपत्र निर्लेखन करण्यात आलेल्या आदेशाच्या पूर्वीचे असावे.

९) या विक्रेत्याने राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,कांदिवली, पूर्व आवारातून गोळा केलेल्या ई-कचऱ्याची विल्हेवाट शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करावी लागेल.

१०) दरपत्रकांसोबत अनामत रक्कम रु.१५,०००/- D.D. स्वरुपात वैद्यकीय अधिक्षक रा.का.वि.यो.रुग्णालय कांदिवली, मुंबई या नावाने या रुग्णालयाच्या रोखपाल विभागात जमा करावेत.

११) यशस्वी दरपत्रक धारकाने दरपत्रके मंजुरीनंतर कोणत्याही कारणास्तव निर्लेखन निरुपयोगी IT ASSETS ताब्यात घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम रुपये १५,०००/- जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल. व सदर रक्कम संबंधीत दरपत्रक धारकास परत करण्यात येणार नाही.